# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या/०५० /२०२०
दिनांक :-२१/०३/२०२०

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

**आदेश**

**वाचाः** १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम१८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१.
३. महाराष्ट्र शासन क्रमांक कोरोना२०२०/प्र.क्र५८/आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०.
४. महाराष्ट्र शासन क्रमांक कोरोना२०२०/प्र.क्र५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०.
५. मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील जा.क्र.जिकाठा/जि.आ.नि.कक्ष/कोरोना/धु.बं./आदेश/२०२०. दि.१७/०३/२०२०.

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भिय क्र.१ अन्वये कोरोना विषाणुचा कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींचे अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ४ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केले आहे.

वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करुन त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.५ अन्वये मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण ठाणे यांनी आदेश निर्गमित केलेले आहे.

त्याअर्थी, शेअर रिक्षा, शेअर ओला, शेअर उबर व ग्रामीण भागातील काळया पिवळया जीपमधुन सर्व सामान्य प्रवासी शेअरिंगद्वारे शहरांतर्गत व ग्रामीण भागात ये-जा करीत असतात. त्या अनुषंगाने प्रवासा दरम्यान कोरोना विषाणु (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे कोरोना विषाणु (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन **"शेअर रिक्षा, शेअर ओला, शेअर उबर व ग्रामीण भागातील काळया पिवळया जीप अशा प्रकारची एकत्रित प्रवासी वाहतुक करणारी व्यावसायिक वाहने " दि.३१ मार्च २०२० पर्यंत पुढिल आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात यावीत,** असे या आदेशान्वये आदेशित करण्यात येत आहे.

या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल संबंधित अधिकारी यांनी निम्नस्वाक्षरीकार यांना करावा.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त अनु.क्र.४ मधील महाराष्ट्र कोव्हीड१९ उपाय योजना नियम,२०२० चे नियम १९ नुसार, भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

(सही/-)
**आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

**प्रति,**
१. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५.
२. प्रभाग आरोग्य निरीक्षक, प्रभाग समिती क्र.१ ते ५.
३. विभाग प्रमुख, (शहर विकास विभाग).

**प्रतः माहीतीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.**
विभागप्रमुख (जाहिरात).
/- यांनी सहा.आयुक्त प्र.स.क्र. १ ते ५ यांचेकडुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल एकत्रित करुन तात्काळ निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

Scanned with CamScanner

प्रतः माहीतीस्तव.

१.मा.पोलिस उप-आयुक्त(परिमंडळ -२), भिवंडी.

२.उप-आयुक्त (मुख्या.).

२.उप-आयुक्त (सार्व.आरोग्य).

३.जाहीरात विभाग.

४.जनसंपर्क अधिकारी.

५.आस्थापना निवड नस्ती.

प्रतः माहितीस्तव .

१.मा.महापौर सो.

२.मा.उप-महापौर सो.

३.मा.विरोधी पक्ष नेता सो.

४.मा.सभापती, स्थायी समिती सो.

५.मा.सभागृह नेता सो,

६.मा.गट नेता सो. (सर्व).

७.मा.सभापती, महीला व बाल कल्याण.

(डॉ.प्रविण आष्टीकर)

आयुक्त

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

Scanned with CamScanner